# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

### दि. २६ जानेवारी २०२० – डॉ. संजीवनी तडेगावकर

सकाळ

# कविता हा आत्म्याचा शब्द : डॉ. तडेगावकर

**राजगुरुनगर, ता. २७ :** "प्रश्न छळत असतात म्हणून लेखक, कवी उद्विग्न आणि अस्वस्थ असतात. या अस्वस्थतेतून कवितेची निर्मिती होते. खरी कविता हा तुमच्या आत्म्याचा शब्द असतो," असे प्रतिपादन प्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी केले.

साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'कविता कालची, आजची आणि माझी' या विषयावर पहिले पुष्प गुंफताना डॉ. तडेगावकर बोलत होत्या. त्यांनी मौखिक परंपरेतून सुरू झालेल्या मराठी कवितेची परंपरा, संत व पंतकाव्याचा कालखंड आणि आधुनिक कवितेचा आढावा घेतला.



डॉ. संजीवनी तडेगावकर

त्या म्हणाल्या, "कवितेतून जीवन कळते, कारण ती जीवनाशी निगडित असते. मनाच्या भावना कवितेतून व्यक्त करता येतात. कवी व वाचक यांच्या जीवनजाणिवा एकजीव होतात, तेव्हा ते काव्य जास्त टिकते. संत तुकाराम ते नामदेव ढसाळ यांच्या कारकिर्दीमध्ये आठशे वर्षांचा कालखंड असला तरी दोघांच्याही काव्यात चीड आणि तिडीक तीच आहे."

लेखकाला जशी राजकीय भूमिका असते, तशी राजकीय लोकांना साहित्यिक भूमिका का असू नये? असा प्रश्न उपस्थित करून त्या म्हणाल्या, "आपण समाजात राहतो आणि राजकारण हे त्याचे अविभाज्य अंग आहे, त्यामुळे राजकीय लोकांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर येण्यात काहीही वावगे नाही. लेखकांनी राजकीय भाष्य करताना साहित्यिक मांडणी करायला हवी."

डॉ. बी. डी. अनुसे यांनी सूत्रसंचालन, तर प्रा. एम. जे. मांजरे यांनी परिचय करून दिला. कांचन घुमटकर हिने आभार मानले.

Pune, District-Today
28/01/2020 Page No. 8

लोकमत

# कविता ही आत्म्याचा शब्द

## डॉ. संजीवनी तडेगावकर : साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर : कवितेची** निर्मितीप्रक्रिया दु:ख, तळमळ आणि अस्वस्थेतेतून होत असते. खरी कविता हा तुमच्या आत्म्याचा शब्द असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी केले.



### मराठी कवितेची परंपरा स्पष्ट केली

- डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी मौखिक परंपरेतून सुरु झालेली मराठी कवितेची परंपरा स्पष्ट करताना संत, पंत, तंत आणि आधुनिक कवितेचा आढावा घेतला. लेखक व वाचक यांच्या जीवनजाणिवा एकजीव होतात तेव्हा ते काव्य जास्त टिकते, असे सांगितले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. कविता कालची, आजची आणि माझी हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, सुशील सिंगवी, ॲड. माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कवितेतून जीवन कळते, मनाच्या भावना, वस्तुस्थिती किंवा मन:स्थिती कवितेतून व्यक्त करता येते. कविता हा प्राचीन काळापासून महत्त्वाचा अभिव्यक्तीचा प्रकार असल्याचे सांगितले. कविता आणि गीते यातील फरक स्पष्ट करताना कवितेत उत्स्फूर्तता असते, तर गीते प्रसंगांची कल्पना करून लिहिली जातात असे त्या म्हणाल्या. कालची, आजची आणि स्वत:ची कविता सादर करताना कवितेच्या बहुरूपी विश्वाच्या, एकूण जगण्याच्या आणि त्यामुळे अर्थात चिंतनाच्या पातळीवर स्वत:च्याही थोडंसं आत उतरण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे, परिचय प्रा. एम. जे. मांजरे यांनी तर आभार कांचन घुमटकर हिने मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Jan 29, 2020
Powered by: erelego.com

# 'खरी कविता ही आत्म्याचा शब्द'

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** कवितेची निर्मितीप्रक्रिया दु:ख, तळमळ आणि अस्वस्थेतेतून होत असून खरी कविता हा तुमच्या आत्म्याचा शब्द असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी केले. त्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत कविता कालची, आजची आणि माझी या विषयावर बोलत होत्या.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, ॲड.माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी मौखिक परंपरेतून सुरू झालेली मराठी कवितेची परंपरा स्पष्ट करताना संत, पंत, तंत आणि आधुनिक कवितेचा आढावा घेतला. लेखक व वाचक यांच्या जीवनजाणिवा एकजीव होतात तेव्हा ते काव्य जास्त टिकते असे सांगताना कवितेतून जीवन कळते, मनाच्या भावना, वस्तुस्थिती किंवा मन:स्थिती कवितेतून व्यक्त करता येते. या दृष्टीने कविता हा प्राचीन काळापासून महत्त्वाचा अभिव्यक्तीचा प्रकार असल्याचे सांगितले. कविता आणि गीते यातील फरक स्पष्ट करताना कवितेत उत्स्फूर्तता असते तर गीते प्रसंगांची कल्पना करून लिहिली जातात असे त्या म्हणाल्या. त्यांनी कालची, आजची आणि स्वत:ची कविता सादर करताना कवितेच्या बहुरूपी विश्वाच्या, एकूण जगण्याच्या आणि त्यामुळे अर्थात चिंतनाच्या पातळीवर स्वत:च्याही थोडंसं आत उतरण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बी.डी.अनुसे, परिचय प्रा.एम.जे. मांजरे यांनी तर आभार कांचन घुमटकर या विद्यार्थिनीने मानले.

# खरी कविता ही आत्म्याचा शब्द : डॉ. संजीवनी तडेगावकर



**राजगुरुनगर | वार्ताहर**

कवितेची निर्मितीप्रक्रिया दु:ख, तळमळ आणि अस्वस्थेतेतून होत असून खरी कविता हा तुमच्या आत्म्याचा शब्द असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी केले. त्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत कविता कालची, आजची आणि माझी या विषयावर बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक अॅड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, अॅड.माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, डॉ.शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी मौखिक परंपरेतून सुरू झालेली मराठी कवितेची परंपरा स्पष्ट करताना संत, पंत, तंत आणि आधुनिक कवितेचा आढावा घेतला. लेखक व वाचक यांच्या जीवनजाणिवा एकजीव होतात तेव्हा ते काव्य जास्त टिकते असे सांगताना कवितेतून जीवन कळते, मनाच्या भावना, वस्तुस्थिती किंवा मन:स्थिती कवितेतून व्यक्त करता येते .

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख